दिनांक-०३/०८/२०२४

**प्रेस नोट**

# सराईत गुन्हेगारांना अटक करून मोबाईल हस्तगत केलेबाबत

दिनांक २६/०६/२०२४ रोजी प्राप्त तक्रारीवरून दोन मोबाईल फोन व रोख रक्कम अशी ८५०००/- रूपये किंमतीची चोरी केलेबाबत ओशिवरा पोलीस ठाणे गु.र.क्र. ७१९/२०२४ कलम ३८० भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नमूद गुन्हयात अद्याप पावेतो केलेल्या तपासामध्ये आरोपी नामे अफजल मुस्ताक शहा, वय १९ वर्षे, साबीर इरफान खान, वय ३० वर्षे यांना दि. ३१/०७/२०२४ रोजी आणि महिला साथीदार आरोपी नामे उर्मिला प्रकाश मोर्या उर्फ पिंकी, वय ३५ वर्षे हिस दि. ०१/०८/२०२४ रोजी अटक करण्यात आली.

नमूद तिन्ही आरोपीतांकडून नमूद गुन्हयातील चोरीस गेलेली पूर्ण मालमत्ता हस्तगत करण्यात आली असून, त्या व्यतिरीक्त इतर गुन्हयात चोरी केलेले **एकूण ५९ मोबाईल, अं.कि. रु. ३ लाख १५ हजार** हस्तगत करण्यात आले आहेत. नमूद दोन्ही आरोपी हे पोलीस ठाणेच्या अभिलेखावरील सराईत चोर आहेत.

सदरची कामगिरी ओशिवरा पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. संदिप पाटील, स.फौ. श्री.सुनिल खैरे, पोलीस हवालदार श्री. आनंद पवार, श्री. सिध्दार्थ भंडारे, श्री. धनंजय जगदाळे, पोलीस शिपाई श्री. राजेंद्र चव्हाण, श्री. सुजय शेरे, श्री. योगेश नागरे व श्री. सोनुसिंह पाटील यांनी पार पाडली आहे.

--------


MACAS